THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 6TH JUNE 1895.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### रेव्हिन्यू डिपार्टमेंट.

मुक्काम जंजिरे मुंबई, तारीख १९ माहे मे सन १८९५.

नंबर ३६६९. हिंदुस्थान सरकारचा खालील जाहिरनामा पुनः प्रसिद्ध केला असे :—

"फिनान्स अँड कामर्स डिपार्टमेंट.

सेपरेट रेव्हिन्यू.

स्टांप.

मुक्काम सिमुला, तारीख ९ माहे मे सन १८९५.

नंबर २१३२.—एस्. आर.—हिंदुस्थानचा स्टांप आक्ट (सन १८७९ चा १ ला), कलम ८, पोटकलम (अ), ह्याअन्वयें दिलेला अधिकार चालवून आलीजा गव्हर्नर जनरल साहेब बहादुर इन् कौन्सिल हे असें फर्मावीत आहेत कीं, मुंबई इलाख्यांतल्या शाळांस, इमारती बांधण्याच्या कारणांसाठीं सरकाराकडून देण्यांत येत असलेल्या ग्रांट इन् एडचें नियमन करण्याबाबद विद्यमानकाळीं त्या इलाख्यांत अमलांत असलेल्या कानूंस अनुसरून जें कोणतेंही ट्रस्ट डीड (ट्रस्टचें खत) आजपर्यंत केलेलें असेल त्यावर १९ रुपयांहून जितकी जास्त स्टांप ड्यूटी पडत असेल तितकी सगळी आजपर्यंतची ड्यूटी माफ केली आहे, आणि अशा ग्रांट इन् एडचें नियमन करण्याबाबद वेळोवेळीं अमलांत असलेल्या कानूंस अनुसरून ह्यापुढें सदर्हूप्रकारचें जें कोणतेंही डीड (खत) करण्यांत येईल, त्यावर पडणारी स्टांप ड्यूटी कमी करून, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल असें फर्मावीत आहेत कीं, तितक्याच रकमेच्या किंवा किंमतीच्या खतावर जितकी ड्यूटी पडत असते तितकी ड्यूटी अथवा १९ रुपयांची रकम, ह्या दोहोंपैकीं जी कमी असेल ती घ्यावी.

(सही) जे. एफ्. फिन्ले,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्थान सरकार.
आलीजा गव्हर्नर साहेब बहादुर इन् कौन्सिल
ह्यांच्या हुकुमावरून,
(सही) जे. मांटीथ.
आक्टिंग सेक्रेटरी निसबत सरकार.

(True Translation)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.



BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.